**प्रेसनोट** दिनांक २९/०६/२०१८

**वाठार पोलीस स्टेशनचे राजकुमार कुंडलिक जगताप, (निलंबीत) पोलीस नाईक ब.नं. ३३३ यांचेवर लाच मागणी केले प्रकरणी गुन्हा दाखल सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

यातील मुळ तक्रारदार यांची पत्नी, सासु व मेहुणे यांचे विरुध्द वाठार पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्याचा ब समरी अहवाल पाठविण्यासाठी व गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी वाठार पोलीस ठाणेचे हवालदार जगताप यांनी १०,०००/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबतची तक्रार, तक्रारदार यांनी दि.१५/०५/२०१८ रोजी नोंदविली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.१५/०६/२०१८ रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये वाठार पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक, राजकुमार कुंडलिक जगताप, ब.नं. ३३३ यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची पत्नी, सासु व मेहुणे यांचेविरूध्द वाठार पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्हयाचे चार्जशिट ब समरी प्रमाणे दाखल करणेसाठी व गुन्हयाचे तपासकामी मदत करण्यासाठी १०,०००/- रुपयांची लाच मागणी केली म्हणुन त्यांचेविरुध्द कारवाईअंती वाठार पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ११४/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ प्रमाणे दिनांक २९/०६/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप अधिक्षक, अशोक शिर्के, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा हे करीत आहेत.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग, सि.स.नं ५२४/अ, जिल्हा पुर्नवसन कार्यालयाजवळ, सदरबझार, सातारा येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२१६२/२३८१३९ वर तसेच हेल्प लाईनक्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

website :- acbmaharashtra.gov.in
Mobile App – www.acbmaharashtra.net
Facebook Page – www.facebook.com/MaharashtraACB

(अशोक शिर्के)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सातारा